# प्रेस नोट ता.२६/०५/२०२३    पोलीस स्टेशन - वाकड

## जिवघेणा हल्ला करुन परागंदा झालेल्या अनोळखी आरोपींचा छडा लावून अटक अटक आरोपी तामिळनाडू राज्यातील सराईत गुन्हेगार

**वाकड पोलीस स्टेशन तपास पथकाची कामगिरी.**

--- ०० ---

इसम नामे मंदार सुनिल कुसे, वय २५ वर्षे, धंदा नोकरी, रा. नानूभाई देसाई रोड, गिरगाव, मुंबई ४ हे त्यांचा मित्राचे नातेवाईकांमध्ये मयत झाल्याने अस्थिविसर्जनासाठी काळेवाडी येथे आले होते. दिनांक २५/०५/२०२३ रोजी ००:३० वा. चे सुमारास ते राहुल रेस्टॉरंट कोटेश्वर पेट्रोलपंपासमोर काळेवाडी येथे जेवणाची पार्सल ऑर्डर घेण्यासाठी बाहेर थांबले असताना ५ ते ६ अनोळखी इसमांनी अचानक त्यांचे जवळ येऊन कोणत्यातरी अज्ञात कारणावरुन त्यांचेवर जिवे ठार मारण्याचे उद्देशाने हल्ला करत त्यांचे डोक्यात कोयत्याने वार केला. फिर्यादी यांचेवर डिवाय पाटील हॉस्पीटल, पिंपरी येथे दवाउपचार सुरु असताना त्यांचे नोंदविलेल्या जबाबावरुन वाकड पोलीस ठाणे गु.र.नं. ५०३/२०२३ भादंवि कलम ३०७,५०४,१४१,१४३,१४४,१४७,१४८,१४९ आर्म ॲक्ट ४,२५ महा.पो.का.क.३७(१)(३) सह १३५, क्रिमीनल ॲमेंटमेंट ॲक्ट ३,७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दाखल गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन मा. श्री. विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी अनोळखी आरोपींचा शोध घेऊन गुन्हा उघड करण्यास आदेशीत केले. त्या अनुषंगाने मा.श्री.गणेश जवादवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक वाकड पोलीस ठाणे यांनी त्यांचे अधिनस्थ असलेल्या तपास पथकाकील सपोनि संतोष पाटील, पोउपनि.सचिन चव्हाण यांचे दोन वेगवेगळे तपास पथक तयार करुन आरोपी तात्काळ अटक करणेबाबत सुचना दिल्या.

त्याप्रमाणे सपोनि.संतोष पाटील व पोउपनि.सचिन चव्हाण यांची गुन्हे प्रकटीकरण पथकाची वेगवेगळी पथके तयार केली. फिर्यादीकडे अधिक चौकशी केली असता असे समजले की, फिर्यादी हे त्याचे मित्रासोबत त्याचे दाजी नामे ज्ञानेश्वर महादू बोरकर, रा. ज्योतीबानगर, काळेवाडी यांचेकडे आले होते. दिनांक २४/०५/२०२३ रोजी अस्थिविसर्जन झाल्यानंतर ज्ञानेश्वर बोरकर यांचे मित्र मोहन चेंदे, बिट्टू ऊर्फ संघर्ष चंदनशिवे असे सर्व कामानिमीत्त एकत्रित फिरले होते. काही दिवसापुर्वी बिट्टू ऊर्फ संघर्ष चंदनशिवे याचे वडीलांना दक्षिण भारतीय मुलाने किरकोळ कारणांवरुन धक्काबुक्की केली होती. सदर दक्षिण भारतीय मुलगा व त्याचे सोबतचे यांचा तापकीर चौक काळेवाडी येथे इडली डोसा विकण्याचा व्यवसाय आहे. दिनांक २४/०५/२०२३ रोजी रात्रौ. १०:३० वा.चे सुमारास बिट्टू ऊर्फ संघर्ष चंदनशिवे याने सदर दक्षिणभारतीय मुलास त्याच्या वडीलांना धक्का बुक्की केलेबाबत जाब विचारला व योग्य ती समज दिली होती. त्यामुळे त्याचा राग मनात धरुन दक्षिण भारतीय ५ ते ६ इसमांनी  कोटेश्वर पेट्रोलपंपासमोर येऊन बिट्टू ऊर्फ संघर्ष चंदनशिवे याचा शोध घेत असताना फिर्यादी तेथे उभे असल्याचे पाहून व फिर्यादी बिट्टू ऊर्फ संघर्ष चंदनशिवे याचे सोबत फिरताना त्याने पाहिले असल्याने फिर्यादी यांचा गंभीर दुखापत केल्याचे निष्पन्न झाले.

आरोपींचा तांत्रिक व पारंपारीक पध्दतीने शोध घेत असताना आरोपी नामे अरुमुगम सुब्बयाह वय २५ वर्षे रा. जगताप नगर, डी मार्टचे मागे कल्पना कांबळे यांचे खोलीत भाडयाने थेरगाव पुणे मुळ रा.४९ पील्लायर कोव्हील रोड,मलुकारकुरीची, तिरुनलवेली राज्य- तमिळनाडु यास थेरगाव मधून अटक करण्यात आली. त्यावेळी त्याचे ताब्यात ०२ किलो २५ ग्रॅम गांजा मिळून आल्याने वाकड पोलीस येथे गु.र.नं. ५०४/२०२३, एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क),२०(ब)(ii)(ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच बाकी आरोपींचा शोध घेत असताना अशी माहिती मिळाली की आरोपी काळेवाडी येथून पळून जाऊन कोठेतरी लपून बसले आहेत. बातमीदारातर्फे माहिती मिळाली की, आरोपी औंध येथे लपून बसले आहेत. मिळालेल्या माहितीप्रमाणे सापळा रचून शिताफीने ०५ आरोपींना ताब्यात घेतले असता त्यांचे नावे १) शंकर अरुनाचलम, वय २५ वर्षे, रा. १६५, उरुडेंयकल स्ट्रीट, मरुकलकुरची, तिरुनेलवेल्ली, तामिळनाडू पिन- ६२७१०८ २) रमेश अरुनाचलम, वय २८ वर्षे, रा. १६५, उरुडेंयकल स्ट्रीट, मरुकलकुरची, तिरुनेलवेल्ली, तामिळनाडू पिन- ६२७१०८ ३) वानमामलाई मुथ्थया, वय १९ वर्षे, रा. २०९, आय्यन कोवील स्ट्रीट, मरुकलकुरची, तिरुनेलवेल्ली, तामिळनाडू ४) इसकीपांडी सुब्बलह, वय २२ वर्षे, रा. ४९,

पिल्लाया कोवील, साऊथ स्ट्रीट, मरुकलकुरची, तिरुनेलवेल्ली, तामिळनाडु - ६२७१०८ ५) मायाकन्नन सुब्रमणी, वय २० वर्षे, रा. थलेयथ्थू, मरुकलकुरची, तिरुनेलवेल्ली, तामिळनाडु सदर आरोपी यांना गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. दाखल गुन्ह्याचा पुढील तपास राजेश मासाळ, पोलीस उप निरीक्षक, वाकड पोलीस ठाणे करीत आहेत.

अटक ०६ आरोपींपैकी ०४ आरोपींच्या वर तिरुनेलवेल्ली, तामिळनाडु येथे गंभीर गुन्हे दाखल असून आरोपी शंकर अरुनाचलम याचेवर १६ गुन्हे, आरोपी वानमामलाई मुथ्थया याचेवर ०७ गुन्हे, आरोपी इसकीपांडी सुब्बलह याचेवर १५ गुन्हे व आरोपी अरुमुगम सुब्बयाह याचेवर ०६ गुन्हे असे भादंवि कलम ३०२,३०७,३९९,३९७,३८७ आर्म ॲक्ट प्रमाणे गंभीर गुन्हे दाखल आहेत. आरोपी यांचे मूळ गावी दोन गटात वैमनस्य असून त्यातूनच गुन्हे दाखल असून सदर वैमनस्यामध्ये संरक्षण मिळण्यासाठी पुणे येथे राहून इडली डोसाचा व्यवसाय करीत असल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदरची कारवाई मा. श्री. विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा.श्री.डॉ.संजय शिंदे सो, सह.पोलीस आयुक्त, मा.श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त, मा. श्री. डॉ.काकासाहेब डोळे सो, पोलीस उप आयुक्त,परि-२, पिंपरी चिंचवड, मा. श्री. पद्माकर घनवट, सहा.पोलीस आयुक्त सो, देहुरोड विभाग, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली मा.श्री. गणेश जवादवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मा.श्री.रामचंद्र घाडगे पोलीस निरीक्षक गुन्हे-२, सपोनि.संतोष पाटील, पोउपनि.सचिन चव्हाण, पोउपनि राजेश मासाळ, सपोफौ.बिभीषण कन्हेरकर, सपोफौ.बाबाजान इनामदार, सपोफौ.राजेंद्र काळे,पोहवा.वंदु गिरे, पोहवा संतोष बर्गे, पोहवा.स्वप्निल खेतले, पोहवा.अतिश जाधव, पोहवा.प्रमोद कदम, पोहवा. संतोष महाजन, पोना.अतिक शेख, पोना.विक्रांत चव्हाण, पोना.प्रशांत गिलबीले, पोशि.अजय फल्ले, पोशि.तात्या शिंदे, पोशि.स्वप्निल लोखंडे, पोशि. सौदागर लामतुरे, पोशि.विनायक घारगे, पोशि रमेश खेडकर, पोशि.कौतेंय खराडे, पोशि.भास्कर भारती, तसेच परिमंडळ-०२ कडील पोशि.पंडीत यांनी मिळुन केली आहे.

**(डॉ.काकासाहेब डोळे)**
पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ-२, पिंपरी चिंचवड